


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# आदिवासींचा पर्यावरणीय लढा आणि लोक जाणिवा

**प्रा. नितीन जगदीश टेकाम**

सहा. प्राध्यापक,

श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा.

आदिवासी समाज आणि पर्यावरण यांचे नाते अतूट आहे. ज्याप्रमाणे आई आपल्या मुलांचे, पालनपोषण करते अगदी तसेच जंगल जिव्हाऱ्यातला, दऱ्याखोऱ्यातला, रानावनातला, निसर्गाशी एकनिष्ठ राहणारा आदिवासी माणूस जंगलासाठी आपले सर्वस्व अर्पण करतो. 'जंगल' हा आपल्यासाठी ईश्वर आहे, ही शुद्ध आणि पवित्र भावना ठेवून निसर्गाशी एकरुप होतात. आदिवासीं समाज संस्कृतीत त्यांच्या, रुढी, प्रथा, परंपरेत निसर्गाचा समावेश पहायला मिळतो. निसर्ग आहे म्हणून आपण आहे ही भावना त्यांच्या मनात खोलवर रुजल्या गेली. आदिम आदिवासी जीवन जंगलाशिवाय पूर्ण होत नाही. आदिवासी समाजात वृक्ष, नद्या, नाले, जमीन, प्राणी यांना ईश्वर म्हणून पूजतात. आपल्या दैनंदिन व्यवहारात त्यांना महत्वाचे स्थान देतात, शिकार करणे ही उपजीविका असली तरी शिकार करतांनाही काही निसर्गाचा नियमही पाळतात. प्राण्याच्या प्रजनन काळात हा समाज शिकार करत नाहीत. आदिवासींच्या सण उत्सवात निसर्ग पूजन परंपरा पहायला मिळतात. जंगल आणि आदिवासी एकमेकांचे पोषक आहे, शोषक नाही. जंगलाच्या सुरक्षेसाठी हा समाज संविधानिक मार्गाने वनाचे संवर्धन आणि संरक्षण वर्षानुवर्ष करत आहे. आदिवासींनी जंगलासाठी दिलेला लढा इतिहासात अजूनही जिवंत वाटतो. आदिवासी हा समाज जंगलात आपला उदरनिर्वाह करत असला तरी जंगलातील अडाणी माणसाचं हृदय देशप्रेमाने ओथंबलेले आहे. जेव्हा हा देश ब्रिटीशाच्या गुलामगिरीत होता तेव्हा आपल्या जल, जंगल, जमीनीसाठी आपल्या हक्कासाठी, अधिकारासाठी मोघलांशी, ब्रिटीशांसोबत लढाया करुन आपल्या प्राणाची आहुती देऊन आपले शौर्य, निष्ठा, पराक्रम आणि त्याग सिद्ध केले. या संदर्भात आपल्याला कितीतरी दाखले देता येतात.

आदिवासींनी आपले जल, जंगल, जमिनीच्या सुरक्षेसाठी त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार आणि शोषणावर आघात करुन आदिवासींनी आपल्या अस्तित्वाची लढाई अधिक सक्षमपणे लढलेली पहायला मिळतात. 1787 मधली बिहारमधील पहाडीया सरदारांचा इंग्रजाविरुद्ध लढा, मुंबई राज्यातील महादेव कोळी जमातीचा संघर्ष, बिरसा मुंडाची चळवळ, ताना भगताची चळवळ, बस्तरच्या आदिवासींचा लढा, तेलंगणातील आदिवासीची चळवळ, गोंड आणि कोलामाची अदिलाबादची चळवळ, कोयाची चळवळ, मुंडा आदिवासीची सरदारी चळवळ, मुंबई राज्यातील वारल्यांची चळवळ,

सावकाराविरुद्ध, जमीनदाराविरुद्ध, लालबावट्याची चळवळ, आपली जय अस्तित्ववादी चळवळ, संताळ परगण्याची चळवळ, लुशाई टेकड्यातील मिझोंच्या चळवळी या सर्व चळवळी आदिवासीचे स्वातंत्र्य चळवळीत असलेले योगदान आपल्याला लक्षात येते.

भारतात पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वेगवेगळ्या अनेक चळवळी, आंदोलने उभी राहली. पर्यावरण वाचविण्यासाठी, वृक्षतोड, थांबविण्यासाठी, आदिवासी समाजाने संविधानिक शस्त्राचा वापर करुन या धरतीला सुजलाम सुफलाम केले. भारतात सर्वप्रथम 1700 व्या शतकात राजस्थान येथील खेजली, मारवाड प्रदेश या भागात पहिली पर्यावरणीय चळवळ उभी झाली. राजाच्या आदेशानुसार त्या भागात भव्यदिव्य राजवाडा बांधण्याचा आदेश सैनिकांना देण्यात आला. सैनिक खेजली भागातील पवित्र झाडे तोडू लागली. गावातील अमृतादेवी आणि अन्य गावकरी मंडळी वृक्षाचं संरक्षण करण्यासाठी झाडाला मिठी मारणे सुरु केलं. अमृतादेवी गावातल्या लोकांना झाडांना वाचविण्यासाठी प्रेरीत करीत होती. या आंदोलनात 363 बिष्णोई गावकरी मारले गेले. सदर घटना जेव्हा राजाकडे पोहचली तेव्हा तो गावाकडे धाव घेऊन लोकांची माफी मागीतली आणि तो जमीनीचा भाग संरक्षीत क्षेत्र म्हणून घो षित केले. आजही तो पर्यावरणासाठी पशू पक्षी प्राण्यासाठी संरक्षीत क्षेत्र म्हणून टिकून आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या बाबतीत चिपको आंदोलन 1973 मधे झाले. चमोली जिल्ह्यातील उत्तराखंड मध्ये टिहरी-गढवाल या भागात या आंदोलताला सुरुवात झाली. गौरादेवी, गौरादेव, बचनीदेवी तसेच सुंदरलाल बहुगुणा यांच्या प्रबोधनाने या आंदोलनाला दिशा मिळाली. मुळात या आंदोलनाचा उद्देश म्हणजे जंगलाच्या ठेकेदाराकडून वनाचे संरक्षण करणे. संरक्षण करतांना मिठी मारणे त्यासाठी जंगलाच्या ठेकेदाराचा विरोध पत्करुन, पर्यावरण संवर्धनाच्या या आंदोलनामुळे विकासात अख्ख्या जगाचे या आंदोलनाकडे लक्ष ओढल्या गेले. त्यानंतर 1978 साली सायलेंट व्हॅली चळवळ वाचवा, जंगल बचाव आंदोलन 1982 साली बिहार मधील सिंहभूम जिल्हानंतर ती चळवळ झारखंड तसेच ओडीसा पर्यंत पसरली. ॲपिको चळवळ 1983 मध्ये कर्नाटक राज्यातील उत्तरा कन्नड तसेच शिमोगा जिल्ह्यात ही चळवळ जंगलाची तोड थांबविण्याचे तसेच व्यापारीकरण आणि प्राचीन उपजीविकेचा नाश करणाऱ्यांच्या विरोधात होती. नर्मदा बचाव आंदोलन 1985 पासून नर्मदा नदी गुजरात मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र राज्यापासून तसेच भारतात आणि भारताबाहेर लहान मोठ्या धरणाविरोधाबाबत निषेध म्हणून ही आंदोलने समोर आली. सरदार धरणाच्या बांधकामामुळे विस्थापित झालेल्या लोकांचे पूनर्वसन न झाल्यामुळे हे निषेध, आंदोलन करत मेघा पाटणकर असो बाबा आमटे, आदिवासी लोक, शेतकरी तसेच पर्यावरणवादी लोकांनाही या चळवळीला न्याय देण्याचे कार्य केले. त्यानंतर टिहरी धरण संघर्ष 1990 मध्ये उत्तराखंडमधील टिहरीजवळ भागीरथी नदी जवळच्या

इकोसीस्टमच्या पर्यावरणीय परिणामाविरुद्ध शहरातील लोकांच्या विस्थापनाचा निषेध या आंदोलनाच्या माध्यमातून सुंदरलाल बहुगुणा आणि इतर लोकांनी पाठींबा देऊन आपले सामाजिक दायित्व पार पाडले अलीकडे तीस्ता उत्तर सिक्कीम मध्ये तीस्ता नदीवर तीस्ता-4 हा 520 मेघा वॅटचा जलविद्युत प्रकल्प उभारल्या जात आहे. आदिवासी समाज तीस्ता, ऱ्होंगगोंग, रंगीत या नद्या वाचवण्यासाठी तसेच काचनगंगा बायोस्फिअर रिझर्व्हच्या पायथ्याशी झोंगू हा निसर्गाने सुंदर असा भाग आहे. त्याचं संरक्षण करण्यासाठी सिक्कीम मधला लेपचा आदिवासी जमात आंतरराष्ट्रीय पातळीवर आंदोलन, उपोषण जनजागृती करुन लढा लढत आहे.

भारतात जवळपास 1983 ओपीको आंदोलन, कर्नाटक, जंगल बचाव आंदोलन 1982 मध्ये बिहार, महाराष्ट्रात मुंबई येथील आरे जंगल वाचविण्यासाठी 'आरे' जंगल बचाव ही पर्यावरणवादी मोहीम चालविण्यात आली, 'साईलेंट वैली बचाओ आभियान' 1973. 2023 मध्ये 'हसदेव जंगल बचाव', छत्तीसगड मध्ये हा 'जंगल सत्याग्रह' अजून लढा दिल्या जात आहे. जालियनवाला बाग हत्याकांड इतके भयंकर अत्याचार या भागातल्या आदिवासीवर होत असतांना दिसतात. खऱ्या अर्थाने भारतात विविध भागात जंगलाच्या सुरक्षितेसाठी आदिवासी समाज रस्त्यावर येत आहे. जंगलासाठी, पर्यावरण संवर्धनासाठी आपल्या हक्क अधिकारासाठी जंगलावर अतिक्रमण करणाऱ्या व्यापाराविरुद्ध एक लढा जंगलासाठी लढताना दिसतात. 'निसर्ग आमचा देव आहे', या पवित्र भावनेने सत्याग्रहाचे रणशींग फुंकून महात्मा गांधीजीच्या स्वप्नातल्या ग्रामस्वराज घडवत भूमिका स्पष्ट करतांना दिसत आहे. निसर्गवाद हा आदिवासीच्या जगण्याची आधारशीला आहे. ही आधारशीला कितीतरी प्राचीन कालखंडापासून एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत मिळालेले वारसा आहे. आदिवासींचा 'निसर्गवाद' हा समाजात शांतता, समता, बंधुता, प्रेम निर्माण करतो, मुळात अत्यंत कठीण परिस्थितीत जगण्याला बळ पुरविण्याचे कार्य हा निसर्ग देतो. म्हणून हा समाज जंगलजिव्हाळ्यात, दऱ्याखोऱ्यात, रानावनात त्या निसर्गाशी एकरुप, एकनिष्ट राहतांना दिसतो.

आदिवासी समाज हा निसर्गाला पूजतात निसर्गालाच सर्वस्व मानून निसर्गात ईश्वराचे अस्तित्व शोधण्याचे कार्य करतो. नैसर्गिक शक्तीच्या ठायी अलौकिक शक्ती आहे. या विचारातून वाघ देवता, डोंगर देवता, सुर्य देवता, चंद्रदेवता, नागदेवता नारणदेवता, इत्यादी नैसर्गिक देवतांची पुजा करतात. आदिवासी समाजात पर्यावरणाविषयी, निसर्गाविषयी आत्मीयता प्राचीन काळापासून पहायला मिळते. निसर्गातला प्रत्येक जीव, पशु, पक्षी, प्राणी यांना देवता मानून भगताकडून पुजा-अर्चना केली जाते. विदर्भातील आदिवासी जमाती प्रामुख्याने 'वाघदेव' आणि 'इंदलदेव' यांना दैवत रुपाने पूजतात. डोंगरदऱ्यात राहणारा, दऱ्याखोऱ्यात राहणारा शत्रू म्हणजे वाघोबा. त्या वाघापासून सुटका होण्यासाठी

त्याची पूजा करतात. आदिवासीच्या पोडावर, पाऱ्यावर दोन गोट्याला शेंदूर लावून पूजा करतात. विदर्भातील कोलाम ही जमात महत्वाची मानली जाते. ही जमात सुर्य पुजक असून सुर्याच्या मावळत्या लाल रंगाचे प्रतीक म्हणून पिवळ्या बोराची पूजा करतात. विदर्भातील कोलाम जमात वाघासारखी गवताची प्रतिकृती करुन त्याची पूजा करतात. भारतात जवळपास सर्व आदिवासी जमाती धार्मिक प्रसंगाच्या वेळी नृत्य करण्याची प्रथा प्रचलीत आहे. नृत्य सादर करतांना प्रगट वस्तुला साक्षी ठेवून प्रसंग, तिथी, वार यांचा योग साधावा लागतो. समोर साक्षी ठेवण्यात येणारे विविध पशु-पक्षी-प्राणी यांच्या प्रतिमा त्यांच्या समोर ठेवून नृत्यातून त्यांची आराधना करतात. वारली समाजात 'नारंनदेव' याची पूजा करतात.

आदिवासी समाजात विविध धार्मिक प्रसंगात त्या निसर्गदेवाला नमन करायच्या वेळी पुरुष वर्ग पायाला घुंगरू बांधून फेर धरुन टाळ्या वाजवून नाचतात. स्त्रीया गायनकाम करतात. काही पुरुष विदुषकाचे सोंग वटवतात. कुठल्याही प्रसंगाला सुरुवात करण्याच्या अगोदर त्यांच्या समजुतीप्रमाणे जमीन, पाणी, आकाश हे देवाच्या मालकीचे आहे म्हणून सर्वप्रथम निसर्गाला नमन करतात. आदिवासी समाजात मोहाच्या झाडाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. 'मोह वृक्ष' हा आपला कल्पवृक्ष आहे म्हणून त्या वृक्षाला जिवापाड जपतात. त्या फुलापासून दारू, जेवणात भाजी, म्हणून तसेच तेल नानाविध औषध मोहाच्या फुलापासून मिळतात. या वृक्षाला जीवनात महत्वाचे स्थान असल्यामुळे ह्या वृक्षाची कत्तल आदिवासी बांधव करत नाही. विविध धार्मिक उत्सवात बांबू, साग, शिरीष, वृक्षाचा उपयोग केल्या जाते पण या झाडाची तोड करतांना त्या वृक्षाची यथोचित पूजा केली जातात. विवाहातील मंडप जांभळ, उंबर या झाडांच्या फांद्या सुवासीनी बायका सर्वप्रथम घेवून जातात मुळात ही वृक्षपुजा वृक्षाप्रती असलेला आदरभाव, प्रेम याची जाणीव करुन देतो.

एकंदरीत वरील विवेचनावरुन आपल्याला लक्षात येते की, हा समाज निसर्ग पुजक आहे. निसर्गाच्या संवर्धनासाठी हा समाज आपल्या जीवाचं रान करतो, निसर्गात असलेले सर्व जीव-जंतू आपले सगेसोयरे आहे. या भावनेने त्याची पुजा-अर्चा करतात. निसर्गाविषयी असलेली श्रद्धा, आस्था यामुळे हा समाज समाजिक, नैसर्गिक बांधिलकी जोपासणारा निसर्गाशी आपले नाते घट्ट करणारा वाटतो. निसर्गाच्या लहरीमर्जीवर निसर्गाच्या आदेशाने जगणे, मरणे शिकणारी आणि शिकवणारी ही संस्कृती आहे. विज्ञान युगात धर्माचे नाते चमत्कार किंवा विश्वासाशी नव्हे तर मानवतेच्या दृष्टीने निसर्गाचा उपयोग करण्याशी राहणार आहे. मुळात पर्यावरण आणि आदिवासी यांचा जवळचा संबंध आहे. निसर्ग हा त्यांच्या जगण्याचा आधारकेंद्र आहे. त्यांच्या रक्षणासाठी तो सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे हे आपल्याला लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. रोंगटे तुकाराम, आदिवासी साहित्य : संचित आणि चिकीत्सा, दिलीपराजा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, 2014
2. मांडवकर, भाऊ, कोलाम, सेवा प्रकाश अमरावती, 1966
3. तुमराम, विनायक, आदिवासी साहित्य : स्वरुप आणि समीक्षा, 1994
4. संकलीत केलेली माहिती.